| | | |
|---|---|---|
| MHRG070008922015 | केस दाखल दिनांक | ०७/१०/२०१५ |
| | केस नोंदणी दिनांक | ०७/१०/२०१५ |
| | केस निकाल दिनांक | ०९/०४/२०२६ |
| | कालावधी | वर्ष महिने दिवस<br>१० ०६ ०२ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत, जि. रायगड यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी – श्रीमती ए. एस. वाडकर)**

**नियमित फौजदारी खटला क्र.१६१/२०१५**

**निशाणी क्र.५६/ब**

| | |
|---|---|
| प्रथम खबरी अहवालाचा तपशील<br>गुन्हा नोंद क्रमांक : ४३/२०१५, दिनांक २३/०४/२०१५<br>पोलीस स्टेशन : नेरळ पोलीस स्टेशन,<br>ता. कर्जत, जि. रायगड | |
| तक्रारदार | कु. दिपाली पांडुरंग भोईर<br>रा.खांडस,ता.कर्जत,जि.रायगड. |
| महाराष्ट्र शासनतर्फे | श्री के. आर. कांबळे सहा. सरकारी अभियोक्ता<br>श्री. सी. वाय. पाटील सहा. सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | **१. काशिनाथ बळीराम भोईर**<br>वय– २५ वर्षे, धंदा– शेती<br>**२. जयदास शिवाजी भोईर**<br>वय– २० वर्षे, धंदा–शेती<br>दोघे राहणार – खांडस,ता.कर्जत,जि.रायगड. |
| आरोपीतर्फे वकील | श्री. अहिर<br>श्री. कराळे |

**(भाग "ब")**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १९/०४/२०१५ |
| गुन्हा नोंदणी तारीख | २३/०४/२०१५ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०७/१०/२०१५ |
| दोषारोप निश्चित तारीख | ११/०९/२०१७ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०६/०३/२०१८ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | ... |
| न्यायनिर्णय घोषित केल्याची तारीख | ०९/०४/२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, जर असेल तर | निरंक |

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | गुन्हा ठेवल्याचा तपशील | शिक्षा दिली किंवा निर्दोष मुक्तता | किती शिक्षा दिली | खटला सुरु असताना आरोपी कारागृहात असल्याबाबतचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | काशिनाथ बळीराम भोईर | २८/०४/ २०१५ | २८/०४/ २०१५ | भारतीय दंड विधान संहिता, कलम ३२५,४५२,५०४,५०६ सह कलम ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २ | जयदास शिवाजी भोईर | २८/०४/ २०१५ | २८/०४/ २०१५ | भारतीय दंड विधान संहिता, कलम ३२५,४५२,५०४,५०६ सह कलम ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

**(भाग "क")**

**अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालय यांचे साक्षीदारांचा तपशील** :-

**अभियोग पक्षाचे साक्षीदार**

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | पांडुरंग सदाशिव भोईर | १८ |
| २ | कविता पांडुरंग भोईर | १९ |
| ३ | शारदा पांडुरंग भोईर | २० |
| ४ | दिपाली पांडुरंग भोईर | २६ |
| ५ | डॉ. गिता मनोहर कदम | ३३ |
| ६ | मुकुंद नारायण म्हात्रे | ६४ |

**आरोपी पक्षाचे साक्षीदार**

| अ.क्र. | साक्षीदारांचे नावे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**न्यायालयाचे साक्षीदार**

| अ.क्र. | साक्षीदारांचे नावे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालय यांचे कागदपत्रांचा तपशील** :–
**अभियोग पक्षाचे कागदपत्र**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | फिर्याद व छापील फिर्याद | २७ व २८ |
| २. | वैद्यकीय प्रमाणपत्र | ३४ |
| ३. | पंचनामा | ४५ |

**आरोपी पक्षाचे कागदपत्र**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**न्यायालयाचे कागदपत्र**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**मुद्देमालाचा तपशील** :–

| अ.क्रं. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

## (जाहीर दिनांक ०९/०४/२०२६)

०१. प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान संहिता, कलम ३२५,४५२,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये चालविण्यात आला.

## अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –

०२. दिनांक १९/०४/२०१५ रोजी सायंकाळी ७.०० वाजेच्या सुमारास फिर्यादी दिपाली पांडुरंग भोईर ह्या अंगणात उभ्या असताना आरोपी क्रं.१ काशीनाथ भोईर व आरोपी क्रं.२ जयदास भोईर याने फिर्यादी यांच्या कुत्राच्या पायावरुन मोटारसायकल नेली व फिर्यादीने आरोपीला त्याबाबत विचारले असता त्याचा राग मनात धरुन आरोपी क्रं.१ व आरोपी क्रं.२ हे दोघे ही फिर्यादी ही त्यांच्या काकांच्या घरात टिव्ही बघत बसलेली असताना आरोपी क्रं.२ याने आरोपी क्रं.१ यांस फोन करुन बोलावून घेतले व फिर्यादीच्या काकाचे घरी येवून काशीनाथ भोईर यांनी फिर्यादीच्या उजव्या डोळ्यावर फाईट मारुन आपखुशीने दुखापत केली व मला हाताबुक्याने मारहाण केली. जयराम भोईर यांनी त्यांना शिवीगाळ केली. व त्या दोघांनी त्यांना जीवे ठार मारण्याची धमकी दिली. त्यामुळे, त्यांनी पोलीस स्टेशनला जावून फिर्याद दाखल केली.

०३. सदर फिर्यादीवरुन गुन्हा नोंद क्र. ४३/२०१५ नोंदविला गेला. सदर गुन्हयाच्या तपासामध्ये तपासी अंमलदार यांनी साक्षीदारांचे जबाब, पंचनामे केले व कागदपत्रे हस्तागत केली व तपास पुर्ण होताच आरोपीविरुध्द सबळ पुरावा आल्याने वरील कलमांन्वये दोषारोपपत्र दाखल

केले.

०४. आरोपी यांचेविरुध्द भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३७९ अन्वये आरोपीचे प्रतिकथन नोंदविले. आरोपीस गुन्हयाचे विवरण त्यांच्या मातृभाषेत वाचुन व समजावून सांगितले असता आरोपीने आरोप नाकारुन संपरिक्षेची मागणी केली. अभियोग पक्षाच्या पुराव्यामध्ये आरोपी विरुध्द कथन आलेले नसल्याने आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब नोंदविण्यात आलेला आहे.

०५. फिर्यादी पक्षाचा पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर खालील मुद्दे माझ्यासमक्ष उपस्थित होत असून त्यांचे निष्कर्ष व त्यासाठीचे कारणे खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.नं.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दिनांक १९/०४/२०१५ रोजी सायंकाळी ७.०० वाजणेच्या दरम्यान, तुम्ही समान हेतू साध्य करण्याच्या उद्दिष्टाने कर्जत येथील मौजे खांडस येथे फिर्यादी–दिपाली पांडुरंग भोईर हिचे काकांचे घरात फिर्यादीस गैरनिरोध/हमला करण्याच्या उद्देशाने गृहअतिक्रमण केले काय ? | | **नकारार्थी.** |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी समान हेतू साध्य करण्याच्या उद्दिष्टाने तुम्ही फिर्यादीचे डोळ्यावर हाताने बुक्की मारुन तिला इच्छापूर्वक जबर दुखापती पोहचविली का ? | | **नकारार्थी.** |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही समान हेतूने उदिदष्टाने फिर्यादी प्रक्षुब्ध होवून सार्वजनिक शांततेचा भंग करावा अथवा तिचे हातून अपराध घडावा या हेतून तिला शिवीगाळ करुन अपमानीत केले ? | | **नकारार्थी.** |
| ४. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही समान हेतू साध्य करण्याच्या उद्दीष्टयाने फिर्यादीस दमदाटी करुन फौजदारी धाकदपटशाह केला का ? | | **नकारार्थी.** |
| ५. | काय आदेश ? | | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ४ बाबत** –

०६. मुद्दा क्र.१ ते ४ हे एकमेकांशी संबंधीत आहेत. त्यामुळे वरील सर्व मुद्दयांवरील पुराव्यातील तीच ती चर्चा टाळण्याकरिता मुद्दा क्र.१ ते ४ ची कारणमीमांसा मी एकत्रीत करत आहे.

०७. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ पांडुरंग सदाशिव भोईर (निशाणी क्रं.–१८) यांचे साक्षीमध्ये असे आले आहे की, दिनांक १९/०४/२०१५ रोजी संध्याकाळी ७.०० वाजता ते घरी असताना फिर्यादीने त्यांना सांगितले की, आरोपी काशीनाथाने कुत्र्याच्या अंगावरुन

गाडी घातली, त्यामुळे फिर्यादी ही चुलतभावाच्या घरी गेली, आरोपी क्र.२ ने फिर्यादीस भावाच्या घरी जाताना पाहिले व आरोपी क्रं.२ ने आरोपी क्रं.१ काशीनाथला ते सांगितले, त्यानंतर दोन्ही आरोपी तेथे गेले, त्यांनी फिर्यादीच्या डोळयावर बुक्की मारली, तिला दमदाटी केली, त्यानंतर फिर्यादी घरी आली व तिने सदरची घटना त्यांना सांगितली. सदर साक्षीदाराने आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी घटना प्रत्यक्ष पाहिली नाही, घटना घडली त्यावेळेस ते बाहेर होते व घटनेनंतर एक तासाने ते गावात आले, घटनेच्या दिवशी मुलीच्या जखमेवर प्राथमिक उपचार केले नव्हते, घटनेच्या दुस–या दिवशी मुलीला उपचारासाठी कळंब येथे नेले, घटनेच्या दुस–या दिवशी फिर्याद दाखल केली इत्यादी बाबी कबूल केल्या आहेत.

०८. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.२ कविता पांडुरंग भोईर (निशाणी क्रं.–१९) यांचे साक्षीमध्ये असे आले आहे की, दिनांक १९/०४/२०१५ रोजी संध्याकाळी ७.०० वाजता त्या घरी असताना फिर्यादीने त्यांना सांगितले की, रस्त्यावर कुत्रा बसला होता, त्याच्या अंगावरुन आरोपी क्रं.१ काशीनाथ यांनी दुचाकी नेली, त्यांच्या बहिणीने त्यांना विचारले म्हणुन तिच्याशी वाद घातला, त्यानंतर फिर्यादी ही हासू भोईर यांच्या घरी गेली, आरोपी क्र.२ ने आरोपी क्रं.१ काशीनाथ यांना फोन करुन बोलावले, दोन्ही आरोपींनी त्या ठिकाणी जाऊन फिर्यादीच्या डोळयावर फाईट मारली, त्यानंतर ते सरकारी दवाखान्यात गेले. साक्षीदाराच्या उलटतपासात असे कथन आले आहे की, घटनेच्या वेळेस त्या घरी होत्या, आरोपींनी फिर्यादीला मारहाण केली व शिवीगाळ केली हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले नाही, घटनेच्या दिवशी गावामध्ये सरकारी

दवाखान्यात बहिणीच्या डोळ्यावर उपचार घेतले इत्यादी बाबी कबूल केल्या आहेत.

०९. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.३ शारदा पांडुरंग भोईर (निशाणी क्रं.–२०) यांचे साक्षीमध्ये असे आले आहे की, घटनेच्या दिवशी संध्याकाळी ७.०० वाजता त्या घरी असताना आरोपी क्रं.१ यांनी कुत्र्याच्या अंगावरुन मोटारसायकल नेली होती त्यामुळे फिर्यादीने आरोपी क्रं.१ यांना शिव्या दिल्या व त्याचा राग आरोपींना आला, त्यानंतर फिर्यादी ही तिच्या काकांकडे टीव्ही बघण्यासाठी गेली असता आरोपी क्र.२ ने आरोपी क्र.१ यांना फोन करुन सांगितले,दोघे आरोपी फिर्यादीच्या काकाच्या घरी गेले,आरोपी क्रं.१ ने फिर्यादीच्या डोळयावर फाईट मारली, फिर्यादीने त्यांना घरी आल्यावर सदरची घटना सांगितली, त्यांनी फिर्यादीला दवाखान्यात नेले व त्यांच्याविरुध्द फिर्याद दिली. सदर साक्षीदाराने आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात असे कथन केले आहे की, घटनेच्या वेळेस त्या घरी स्वयंपाक करत होत्या, संभाजी भोईर यांच्या घरी घडलेली घटना त्यांनी प्रत्यक्ष पाहिली नाही, फिर्यादीच्या डाव्या डोळ्याला लागले होते, तिला दुस–या दिवशी सकाळी ९ ते १.०० वाजता कडाव येथील दवाखान्यात नेले इत्यादी बाबी कबूल केल्या आहेत.

१०. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.४ दिपाली पांडुरंग भोईर (निशाणी क्रं.–२६) यांचे साक्षीमध्ये असे आले आहे की,दिनांक १९/०४/२०१५ रोजी संध्याकाळी ७.३० वाजता त्या घरी असताना त्यांच्या घरासमोरील रस्त्यावर त्यांचा कुत्रा बसला होता, दोन्ही आरोपी त्यांची गाडी घेऊन आले व कुत्र्याच्या पायावरुन गाडी नेली, त्यांनी त्यांना

"कुत्र्याच्या पायावरुन गाडी का नेलीत "? असे विचारले असता ते तेथुन रागाने निघुन गेले, त्यानंतर संध्याकाळी ७.३० वाजता त्या त्यांचे काका संभाजी हासू भोईर यांच्या घरी गेल्या, त्यावेळी आरोपी क्र.२ जयदासने आरोपी क्र.१ यांना फोन केला, त्यानंतर त्या काकांच्या घरी गेल्या व त्या टीव्ही बघत असताना काशीनाथने त्यांच्या डाव्या भुवईवर फाईट मारली.त्यानंतर त्या चक्कर येवून खाली पडल्या. घरी जावून सदर घटना त्यांनी त्यांच्या वडीलांना सांगितली. सदर साक्षीदार फिर्यादी हिने आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात असे कथन केले आहे की, कुत्राच्या अंगावरुन गाडी घातल्यानंतर एक तासांनी काकांच्या घरी टि.व्ही पाहायला गेल्या होत्या, त्यावेळेस त्यांच्यासोबत काका काकी व त्यांची मुले होती, त्यांचे आई वडील घरी होते, घटनेच्या वेळी असलेले दुसरे काका व त्यांची पत्नी यांची नावे पोलीसांना जबाब देताना सांगितली होती, परंतु ती नावे लिहीली नाहीत, कुत्र्याच्या पायावरुन गाडी घातली होती, त्यामुळे त्याला दुखापत झाली होती व त्याला खंडस येथे उपचार घेतले, त्यांच्या डाव्या डोळ्यावर झालेल्या दुखापतीवर त्यांनी महिनाभर उपचार घेतले, घटनेच्या दुस–या दिवशी त्या दवाखान्यात गेल्या होत्या, घटनेनंतर तीन ते चार दिवसानंतर त्यांनी फिर्याद दिली, घटनेमध्ये केवळ त्यांच्या उजव्या डोळ्याला दुखापत झाली होती इत्यादी बाबी कबूल केल्या आहेत.

११. सदर सर्व साक्षीदार क्रं.१ ते ४ यांच्या पुराव्यांचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, साक्षीदार क्रं.१ ते ३ यांनी कोणतीही घटना घडताना पाहिलेली नाही. फिर्यादीने घटनेच्या दिवशी उपचार घेतल्याबाबत साक्षीदार क्रं.२ हिने उलटतपासात सांगितले आहे, परंतु साक्षीदार क्रं.१, ३ व ४ यांनी घटनेच्या दुस–या दिवशी उपचार घेतल्याबाबत त्यांच्या पुराव्यामध्ये नमूद केलेले आहे. फिर्यादीचे अवलोकन

केले असता, निशाणी क्रं.२७ चे अवलोकन केले असता, फिर्यादीच्या उजव्या डोळ्यावर दुखापत असल्याचे नमूद आहे, परंतु फिर्यादीने तिच्या सरतपासात डाव्या भुवईवर फाईट मारली व उलटतपासात डाव्या डोळ्याच्या दुखापतीवर तिने उपचार घेतले असे नमूद केलेले आहे व पुढे केवळ माझ्या उजव्या डोळ्याला दुखापत झाली असे कबूल केलेले आहे. फिर्यादी हिने तिच्या पुराव्यामध्ये केलेल्या विधानांवरुन असे दिसून येते की, तिच्या दुखापतीबाबत एकसारखा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. तिच्या व इतर साक्षीदारांच्या पुराव्यातील कथनांमध्ये तफावत दिसून येते, तसेच फिर्याद ही उशीरा दाखल करण्यात आल्याबाबतचे कुठलेही ठोस कारण नमूद करण्यात आलेले नाही.

१२. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.५ डॉ. गीता मनोहर कदम (निशाणी क्रं.–३३) यांचे साक्षीमध्ये असे आले आहे की, दिनांक २०/०४/२०१५ रोजी फिर्यादी दिपाली पांडुरंग भोईर, वय १९ वर्षे, राहणार खांडस, नेरळ या नेरळ पोलीस ठाण्याच्या यादीसोबत वडिलांसह उपचार घेण्यासाठी त्यांच्याकडे आल्या होत्या, दिनांक १९/०४/२०१५ रोजी संध्याकाळी ७.०० वाजता मारहाण झाल्याचा पुर्वेतिहास त्यांनी त्यांना सांगितला, त्यांनी तिची तपासणी केली असता त्यांना पहिली जखम उजव्या डोळयाच्या वर काळीनिळी आकार ३ x १ सेमी, दुसरी जखम उजव्या डोळयाच्या बाजुला काळीनिळी आकार १ x ०.८ सेमी व ०.५ x ०.५ सेमी व तिसरी जखम उजव्या डोळयाच्या खाली काळीनिळी आकार ५ x १ सेमी. अशा जखमा आढळुन आल्या, त्यांनी फिर्यादीवर प्राथमिक उपचार करुन तिला कशेळे ग्रामीण रुग्णालय येथे पाठविले, फिर्यादीला झालेल्या जखमा या १२ तासांपेक्षा जास्त कालावधीच्या होत्या, त्याप्रमाणे त्यांनी वैद्यकीय प्रमाणपत्र दिले, फिर्यादीला झालेल्या जखमा एखाद्या व्यक्तीने बुक्कीने

डोळयावर मारल्यास होऊ शकतात. सदर साक्षीदाराने उलटतपासात असे कथन केले आहे की, रुग्ण पांडुरंग भोईर हे त्यांच्याकडे तपासणीसाठी आले होते, दिपाली भोईर यांना झालेल्या जखमा या साध्या स्वरुपाच्या होत्या, अंधारामध्ये खरबडीत जागेस धडकल्यास अशा जखमा होवू शकतात, दिपाली भोईर यांना उजव्या डोळ्यावरती, खाली व बाजूला जखमा झाल्या होत्या इत्यादी बाबी त्यांनी सांगितल्या आहेत.

१३. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.६ मुकुंद नारायण म्हात्रे (निशाणी क्रं.–६४) यांचे साक्षीमध्ये असे आले आहे की, गुन्हा नोंद क्र.४३/२०१५ भा.दं.वि. कलम ३२५, ४५२, ५०४, ५०६, ३४ या गुन्हयाचा तपास त्यांनी केला, दिनांक २४/०४/२०१५ रोजी ते पंचांसह घटनास्थळी गेले, त्यांना घटनास्थळ फिर्यादीने दाखविले, घटनास्थळी फिर्यादी टीव्ही बघत असताना आरोपींनी त्यांच्या घरी जाऊन "माझ्या कुत्र्याच्या अंगावरुन गाडी का घातली" ? असा जाब फिर्यादीने आरोपींना विचारला होता याचा राग मनात धरुन त्यांनी फिर्यादीच्या उजव्या डोळयावर हाताने फटका मारला, त्यांनी पंचनामा केला, त्यानंतर फिर्यादीस वैद्यकीय तपासणीकरिता खांडस आरोग्य केंद्रात पाठविले, वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले, साक्षीदारांचे जबाब नोंदविले, त्यांना तपासाअंती तुमच्याविरुध्द पुरावा निष्पन्न झाल्याने त्यांनी आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. सदर साक्षीदाराने त्यांच्या उलटतपासात असे कथन केले आहे की, घटनास्थळ वर्दळीचे असताना देखील स्वतंत्र साक्षीदार तपासलेले नाहीत, असे कबूल केले आहे.

१४. वरील साक्षीदारांच्या साक्षी पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, फिर्यादीला झालेल्या दुखापती बाबत पुराव्यामध्ये

तफावत आहे तसेच फिर्याद ही उशीरा देण्यात आलेली आहे, घटना पाहिलेला एकही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासण्यात आलेला नाही. कुत्र्याला झालेल्या दुखापतीबाबत कोणतेही कागदपत्र अभिलेखावर दाखल केलेले नाहीत. वरील सर्व बाबीचा विचार करता, फिर्यादीतील कथनाबाबत संशय उपस्थीत होतो. आरोपीं विरुध्द कोणताही ठोस पुरावा न्यायालयासमोर आलेला नसल्याचे दिसून येत आहे. फौजदारी खटल्यामध्ये आरोपी विरुध्द दोषारोप अहे संशयाच्या पलीकडे सिध्द करणे गरजेचे असते. परंतु, प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्ष आरोपींविरुध्द गुन्हा सबळ पुराव्याअभावी सिध्द करु शकला नाही. त्यामुळे आरोपी हे संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.५ बाबत** –

१५. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदारांच्या पुराव्यावरुन अभियोग पक्ष हा आरोपीचा गुन्हा सिध्द करण्यास पूर्णतः अपयशी ठरला आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता मुद्दा क्र.५ च्या निष्कर्षान्वये मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी **क्र. १ ते २ यांना** भारतीय दंड विधान संहिता, कलम ३२५,४५२,५०४,५०६ सह कलम ३४ या गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचे जामीन व बंधपत्रे रद्द करण्यात येतात. |
| ३. | या न्यायनिर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील झाल्यास त्याकामी |

| | |
|---|---|
| | हजर होणेकरिता आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) नुसार प्रत्येकी रुपये १५,०००/- चे वैयक्तिक व जामीनदाराचे बंधपत्र देण्यात यावे. |
| ४. | प्रस्तुत प्रकरणात कोणताही मुद्देमाल जप्त करण्यात आलेला नाही. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.) |

Sd/-

दिनांक – ०९/०४/२०२६

(श्रीमती ए. एस. वाडकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत,
जि. रायगड